
खान्देशातील

लेवापाटीदार समाजाच्या

वैदिक सत्पंथाचे

सत्यस्वरुप



ॐ

खान्देशातील

लेवापाटीदार समाजाच्या

वैदिक सत्पंथाचे

सत्यस्वरूप



लेखक

श्री. दत्तात्रेय रामचंद्र रारावीकर

हिंदुधर्म प्रचारक, मु. अकोला (वऱ्हाड)

प्रकाशक

श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन

श्री सत्पंथी मंदीर, संस्थान,

फैजपूर, ता. यावल, जि. जळगांव

फोन नं. : (०२५८५) ४५४१७

प्रथम आवृत्ती : सन १९३१

द्वितीय आवृत्ती : सन २०००

1st Edition: 1931

2nd Edition: 2000

मुल्य : रू. ५ /-

मुद्रक

कांचन ऑफसेट

फैजपूर, ता. यावल, जि. जळगांव

फोन : (०२५८५) ४५६४९

अल्प निवेदन

श्री. शंकराचार्य मठ करवीर व संकेश्वर यांनी एक आज्ञापत्र काढून सत्पंथास हिंदुधर्मबाह्य ठरविले आहे, असे वर्तमानपत्रातून माझ्या वाचण्यात आल्यामुळे, सत्पंथात खरोखर धर्मबाह्य व हिंदुधर्माला विघातक असे काय आहे याची माहिती व्हावी, म्हणून सत्पंथाच्या बाबतीत विशेष प्रसिध्द असलेल्या खानदेशांतील फैजपूर गांवी मुद्दाम जाऊन तेथील सत्पंथीयांच्या आचरणाचे मी बारकाईने निरीक्षण करण्याचे ठरविले. सत्पंथी हे बरेचसे आचारविचार मुसलमानी धर्मातील पाळत असून, मोहरमच्या सणातही ते भाग घेतात, अशी त्यांच्यासंबंधाने अफवा आहे. तेव्हा अनायसे मोहरमचेच दिवस असल्यामुळे खरा खोटा प्रकार कळण्यास हा मौका उत्तम असल्याने मी ता. २७/५/३१ रोजी फैजपूर येथे जाऊन दाखल झालो. तेथे गावांतील एका सद्गृहस्थाकडे आगांतुकी करून मी माझे बिऱ्हाड तर त्यांच्याकडे ठोकले. ही मोहरमची आठवी तारीख असल्यामुळे अजून तीन दिवस मोहरमचे शिल्लक होते. ह्या ३/४ दिवसात मोहरमांतील दंगल, सोंगे, स्वाऱ्या, ताबूत या सर्वांचे बारकाईने निरीक्ष करून तपास केला. तेव्हा तपासाअंती असे कळून आले की, मोहरमच्या सणांत भाग घेणाऱ्या हिंदूत सत्पंथी कोणीच नाही. मोहरमच्या सणांत सत्पंथी भाग घेत असल्या बद्दलचे कोणाकडूनच कळले नाही. शेवटी येथे सत्पंथ समाजाचे सन्माननीय पुढारी श्रीमान् तोताराम बधू महाजन यांचे नांव कळले. तेव्हा त्यांना भेटून त्यांची मुलाखत घेतली. त्यांच्या मुलाखतीत झालेली प्रश्नोत्तरे या

छोट्याशा पुस्तकात दिलेली आहेत त्यावरून त्यांना हिंदुधर्मबाह्य अगर अहिंदु म्हणता येते की काय? याचा सुज्ञ वाचकांनी विचार करावा.

श्री. तोताराम महाजन यांच्या मुलाखतीत मी त्यांना सहज प्रश्न विचारला,'कायहो आपले पुष्कळसे हिंदु मोहरमच्या सणांत भाग घेतात, तेव्हा तुमच्या सत्पंथापैकीही काही लोंक त्यात भाग घेत असतीलच?' त्यावर त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला. ते म्हणाले 'आम्हा खेरीज इतर हिंदूच स्वाऱ्या काढतील, पंजे मिरवतील, सोंगे घेतील, ताबुतांच्या दर्शनास काय पण पूजेस देखील जातील, नवस करतील; परंतु आमच्या पैकी कोणीही सत्पंथी ह्या सर्व गोष्टी हिंदुधर्मबाह्य समजतो. आमच्या सत्पंथ समाजापैकी एक देखील इसम त्यांत भाग घेतलेलाच काय पण दर्शनास देखील गेलेला आढळणार नाही.' ही माहीती मिळाल्यावर तेथे सत्पंथ समाजाचे एक मंदीर आहे, ते पहाण्यास मी मुद्दाम गेलो. देवळावर एक मोठी ॐ चिन्हालंकृत भगवी ध्वजा मोठ्या डौलाने फडकत असते. पहाणाराचे चित्त ती तेव्हाच आकर्षण करते. मला प्रथम ते कोणा वारकरी पंथाचे देऊळ अगर एकदा रामदासी मठ असावा असेच वाटले. देवळात जाताच तेथे असलेल्या हौदावर प्रथम स्वच्छ हातपाय धुवुन नंतर आंत दर्शनास जावयाचे असते, असे तेथील महंतांनी (म्हणजे पुजाऱ्याने) सुचविल्यावरून हातपाय धुवून आंत दर्शनास गेलो. देऊळ जुन्या पध्दतीचे असून पुष्कळ प्रशस्त म्हणजे दोन अडीचशे मंडळीचा तेथे सहज समावेश होऊ शकेल असे आहे. आंत सिंहासनवजा असा ओटा बांधला असून त्यावर महंताची पूजेची बैठक व सत्पंथाचे दैवत अशी योजना आढळली. तिथे एका लहानश्या चांदीच्या चौरंगावर चांदीचा कलश व त्यावर छत्र आणि पूर्वेकडे तोंड करून जळत असलेली घृतज्योत यांची स्थापना दिसून

आली. महंताचे तोंड पूजेच्या वेळी उत्तरेकडे येते. नुकतीच पूजा आटोपली होती. त्यामुळे उद, उदबत्त्या व ताज्या मोगऱ्याच्या फुलांचा घमघमाट चोहींकडे दरवळून राहिला होता. त्या शांत जागी ती जळणारी संथ घृत-ज्योत व तो दरवळून राहिलेला सुगंध त्यांच्या योगाने मन खरेखरच प्रसन्न झाले. दहा पाच मिनीटे तेथे थांबून नंतर देवळाचे वरील भागांत पंथाचे एक मोफत वाचनालय आहे ते पहाण्यास गेलो. वाचनालयात अजमाशे पाचशे पुस्तके असून हिंदूंचे बहुतेक प्रसिध्द धर्मग्रंथ तसेच स्वामी रामतीर्थ व विवेकानंद यांचेही भागही आढळून आले. सत्पंथाच्या ग्रंथासंबंधी चौकशी करता ते मुंबई हायकोर्टात अपील चालल्यामूळे तिकडे पाठविण्यात आले आहेत म्हणून कळले. ह्या ग्रंथाच्या नकला केलेल्या असून त्या मुंबईस वकीलाकडे आहेत, अ.भा. हिंदू महासभेच्या वेळी तपासून घेण्याकरीता त्या आम्ही शक्य तोंवर हजर करू असे मला सांगण्यात आले. वाचनालयात पंधरा वीस मिनीटे थांबलो. त्या ठिकाणी बरीचशी सत्पंथी मंडळीही आली होती. त्यांच्या म्हणण्याचा आशय "कायहो आम्ही हिंदु नाही म्हणून शंकराचार्यांनी ठरविले आहे असे जिकडे तिकडे प्रसिध्द झाले आहे. पाहा, आजकाल हाडाच्या अस्सल मुसलमानाला देखील हिंदु करून घेतले जात आहे. आणि आम्ही मुळचे अस्सल हिंदु असून 'अहो आम्हाला हिंदू धर्माच्या बाहेर घालवू नका' असे काळकूत करून सांगत असतांनासुध्दा आम्हाला घराबाहेर घालविण्याचा प्रयत्न केला जात आहे! खरोखर आमच्यावर हा मोठा गजहब आहे. आम्ही मुसलमान बनल्याने सनातन धर्माचे मोठेच रक्षण होणार आहे. असे शंकराचार्यांना वाटते?' त्यांचे हे भाषण ऐकून माझे हृदय भरून आले. मी त्यांना म्हटले "यःकश्चित मूठभर कर्मठ लोकांच्या म्हणण्याकडे लक्ष न देता अ.भा. पाहिजे हिंदु महासभेपुढे तुम्ही आपले गऱ्हाणे मांडा. अ.भा. हिंदु महासभा

तुम्हाला योग्य तो निर्णय देईल व तोच सर्वमान्य गणला जाईल. तुम्ही धीर सोडू नका. तुमच्या पंथाचा एखादा ग्रंथ वगैरे मला पहावयास मिळाला असता, तर ठीक झाले असते'' माझे हे बोलणे ऐकून त्यांचे पंचपदी भजनावलीचे हस्तलिखीत पुस्तक दाखविले बहुतेक सर्व पदे मी वाचून पाहिली. पदें काही हिंदी, काहीं गुजराथी व काही मराठी अशी आहेत, तरी मुख्यतः भरणा गुजराथी पदांचा आहे. बरीचशी पदे व पुष्पांजली ही अध्यात्मपर आहेत. व आरतीमध्ये परमेश्वराच्या दशावतारांना आळविले असून, निष्कलंक रूपाने तूंच सर्व जगाचा उध्दार करणारा आहेस असे म्हटले आहे. येणेंप्रमाणे सर्व पाहून झाल्यावर मंडळींना आश्वासनपर धीर देऊन मंदिराच्या बाहेर पडलो व बाहेर येताच सहाजिक ध्वजेकडे पुन्हा लक्ष गेले व मनांत काही विचार येतात, इतक्यात तेथे उभ्या असलेल्या एका वृध्दाने दर चैत्र शु।। प्रतिपदेस येथे ध्वजारोपण होत असते म्हणून सांगितले. चैत्र शु।। प्रतिपदेला जुनी ध्वजा काढून नव्या ध्वजेची ब्राह्मणांच्या हातून पूजा करवून नंतर ती चढविण्यात येते, अशी माहिती दिली. ती ऐकून मला फार आनंद झाला. व त्याबरोबरच खेदही वाटला की, येथील सत्पंथीयांचे सर्व आचार विचार व धर्मविधी हे हिंदुधर्मपध्दतीप्रमाणे असतांना त्यांच्यावर बहिष्कार कां टाकण्यात यावा? तेव्हा बारीक चौकशीअंती कळले की, सत्पंथ समाजाचे मूळ गुरू बाबा इमामशहा हे जातीने मुसलमान असल्यामुळे केवळ त्यां एकाच गोष्टीचा फायदा घेऊन त्यांच्या काही प्रतिस्पर्ध्यांनीं त्यांच्याविषयी नाही नाही त्या कंड्या समाजांत पसरवून दिल्या आहेत. पारमार्थिक गुरू जातीनें मुसलमान असूनही जर तो हिंदु धर्मतत्वज्ञानाचा उपदेश करीत असला तरी त्यांत बिघडलें कोठें? उलट हिंदुधर्माचा तो एक विजयच होय. कबीर व दादु पिंजारी हे मुसलमान होते, म्हणून यांच्या हिंदु चेल्यांना कोणी जातिबहिष्कृत अगर हिंदुधर्म बाह्य केल्याचें कोठें

ऐकिवांत नाही. तुकाराम महाराजांचा एक चेला मुसलमान होता त्याचे नांव शेख महंमद होते. त्याचे पुष्कळसे चेले हिंदु होते, त्यांना कोणी अहिंदु अगर मुसलमान म्हटलें नाही. तसेंच आधुनिक सत्पुरूष शिरडीचे सांईबाबा मुसलमान होते त्यांचेहि पुष्कळसे मोठमोठ्या ब्राह्मणादि जातीपासून हिंदु लोक चेले आहेत, म्हणून त्यांना कोणी हिंदु धर्मबाह्य ठरविलें आहे काय? नाही. मग सत्पंथियांनाच कां बरें हिंदुधर्मबाह्य ठरविण्यांत यावे? हा धडधडीत अन्याय नाहीं कां? कोणीं म्हणतील अहो त्यांचे ग्रंथ हिंदु धर्माला विघातक असें आहेत. परंतु खानदेशांतील लेवा सत्पंथी "आमचे ग्रंथ तुम्ही शंकराचार्यापुढें व इतर विद्वज्जनापुढें नेऊन ते तपासून पहा, त्यांत हिंदुधर्मबाह्य असे कांही असल्यास तिकडे दुर्लक्ष करून त्यांच्या जातिवाल्यांनी त्यांना जातिबहिष्कृत करावें, यापेक्षां त्या जातीच्या अनुदार कोत्या व आकुंचित मनोवृत्तीचें दुसरें कोणतें योग्य उदाहरण असेल? खानदेशांतील लेवा सत्पंथियांना त्यांच्या जातीनें ते वैदिक धर्मबाह्य आचार पाळतात अशा सबबीवर कोणतीहि विशेष चौकशी न करतां केवळ दुराग्रहानें इ. स. १९२२ सालापासून जातिबहिष्कृत करून त्यांच्यांशी सर्व रोटीबेटीव्यवहार बंद केलेलें आहेत व त्यापूर्वी झालेले सर्व कुंवार सोयरीक संबंधहि तोडून टाकण्यांत आले आहेत. तथापि अद्याप पावेतो सत्पंथीयांनी आपली हिंदुधर्मावरील अढळ निष्ठा यत्किंचितही कमी होऊं दिलेली नाही. असें असतांना देखील शंकराचार्यांनीं या सर्वावर कळस म्हणूनच कीं काय कांहीं लोकांच्या निव्वळ चिथावणीवरून या पंथाला वेदबाह्य ठरविणारे आज्ञापत्रक काढिलें आहे. शंकराचार्यांच्या ह्या निर्णयानें सत्पंथी समाजावर आधींच असलेल्या बहिष्काराच्या शस्त्रास आतां चांगलीच धार फुटून हिंदुधर्मात यापुढें त्यांना जगण्यास मुष्कील जाऊन ते हिंदुधर्मास व हिंदुसमाजास पूर्णपणें वैतागतील अशी त्यांजभोवती परिस्थिती निर्माण केलेली आहे. ह्या परिस्थितीला खरोखरच वैतागून जर सत्पंथी ख्रिश्चन अगर मुसलमान यांच्या जाळ्यांत जाऊन फसले तर

त्यांत शंकराचार्यांच्या पदरांत कोणतें धर्मरक्षणाचें श्रेय पडणार आहे? तसेंच आपल्याच जातींच्या लोकांना हिंदुत्वापासून जबरदस्तीनें दूर ढकलण्यांत किंवा ते मुसलमान झालेले डोळे भरून पाहण्यांत त्या जातींच्या लोकांना काय भूषण आणि धन्यता वाटत असेल हें एक तेच जाणोत! लेवा सत्पंथीय समाजातील लोक हें आज नव्यानेंच सत्पंथ पाळीत आहेंत असें नव्हें. बहिष्कार पडण्याच्या कैक वर्षे अगोदरपासूनच ते हा पंथ पाळीत आहेत. तेव्हां त्यावेळीं वेदबाह्य अगर मुसलमानी धर्मासारखा धर्म पाळीत आहेत असें कोणासच कसें आढळलें नाहीं व आतांच कसें आढळलें? त्यांना जर आतां जाति बहिष्कृत केले आहे तर त्यांना जाती बहिष्कृत करण्याच्या पूर्वी ज्यांच्या ज्यांच्याशी त्यांचे रोटीबेटीव्यवहारादि संबंध झालेले आहेत त्या त्या सर्वांनांच जातीबहिष्कृत करणें भाग आहे. तसें जर न केलें तर सत्पंथियांच्या बाबतीत त्यांचे ज्ञातिपंचांकडून तो मोठा अन्याय होणार आहे असेंच कोणींही विचारी मनुष्य म्हणेल.

शंकराचार्यांकडे दोन तीन जण अर्ज देतात काय व शंकराचार्य लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी हिंदु समाजाच्या एका विभागास हिंदुधर्म बाह्य ठरवितात काय! सारेंच आश्चर्य! शंकराचार्यांची गादी म्हणजे कोणाअस्मानी सुलतानीचे तें तख्त आहे की काय? हिंदु धर्म जयिष्णु वर्धिष्णु करण्याऐवजीं आपल्या या अशा कृतींनीं शंकराचार्य जर हिंदु धर्माचा ऱ्हास करूं लागतील, त्याच्या नरडीला नख देऊं लागतील, तर त्यासारखें दुर्दैव दूसरें कोणतें? हिंदु समाजाला आतां हे असले कूपमंडुक वृत्तीचे शंकराचार्य नको आहेत तर हिंदु समाजाला जयिष्णु वर्धिष्णु करून संघटनक्षम करणारे शंकराचार्य हवें आहेत व तसे ते असतील तरच यापुढें त्यांचा मान ठेवला जाईल. 'वेद म्हणजे भांगेच्या तारेंतील बडबड' असें म्हणणाऱ्या सत्यशोधकांपुढें मात्र या शंकराचार्यांच्या नांग्या ढिल्या पडतात. परंतु जे यांचे पाय धरण्यास येतात, आम्ही हिंदु आहोत आम्हांलां पदरांत घ्या म्हणून त्यांच्यापुढें जे लोटांगणें घालतात, त्यांच्यावर मात्र हे शस्त्र

धरून तय्यार! तेव्हां 'घरच्या म्हातारीचा काळ' यापेक्षां यांना दुसरी कोणती उपमा देणार? सत्पंथियांचें आचरण व त्यांचें ग्रंथ, शंकराचार्यांनीं अगोदरच परीक्षण करावयाचें होतें व त्यांत जर खरोखरच हिंदुधर्मबाह्य असें कांहीं आढळलें असतें, तर ते त्यांना सोडावयास लावावयाचें होते. व जर ते त्यांनी सोडले नसते, ती आज्ञा मानली नसती तर मग पुढचा प्रश्न! या शंकराचार्यास आमचा असा सवाल आहें की, सत्पंथी हे हिंदुधर्मबाह्य अर्थात् वेदबाह्य मार्गाचें आचरण करीत आहेत असें जर आपल्या कानांवर आलें होतें, तर खरोखरचं परीस्थिति काय आहे याबद्दलची चांगली शहानिशा करून, मगच योग्य तो निर्णय देण्याचे आपले कर्तव्य नव्हते काय? परंतु तसें न करतांना हल्ली जो आपण निर्णय दिला आहे, त्यावरून हिंदु धर्माविषयींची अनास्था व निव्वळ अदूरदर्शित्व यांचे माप आपलें पदरांत पडत नाहीं काय? ज्यांचे हिंदुधर्मावर अढळ प्रेम आहे, कांहीं जरी झाले! प्राण जरी गेलें तरी बेहत्तर पण हिंदुधर्म सोडणार नाही, असा ज्यांचा अट्टाहास आहे अशांची हिंदुधर्मातून हकालपट्टी करणें यांतच सनातन धर्माचें स्वारस्य आहे काय? अस्तु.

सुज्ञ व विचारी वाचकांनी या पुस्तकांतील प्रश्नोत्तरावली वाचून पाहिल्यास त्यांना स्पष्टपणें असेंच आढळून येईल कीं, लेवा सत्पंथी यांचा पंथ हा वेदबाह्य नसून तो पूर्ण वेदांतर्गतच आहे व त्यामुळे त्यांचा हिंदुत्वावरील कोणताही हक्क यत्किंचितहि कमी होत नसून हिंदुधर्मावर व हिंदुत्वावर त्यांचा पूर्ण हक्क आहे अशी त्यांची खात्री पटेल.

आपला नम्र,
दत्तात्रय रामचंद्र रारावीकर.
हिंदुधर्मप्रचारक

सत्पंथाचे सत्यस्वरूप

प्रश्न : आपण सत्पंथ कधीपासून पाळीत आहां?

उत्तर : आमच्या घराण्यांत तो कैक पिढ्यांपासून आहे.

प्रश्न : या पंथाचा मुळ पुरूष कोण आहे?

उत्तर : इमामशहा नांवाचा एक साक्षात्कारी साधू होवून गेला, त्याने या पंथाची स्थापना केली.

प्रश्न : हिंदूंची इतकी दैवते असतांना, या इमामशाहालाच तुम्ही कसे जाऊन चिकटलात याचेच मला आश्चर्य वाटते?

उत्तर : या आपल्या प्रश्नावरून आम्ही इमामशाहाला भजतो अशी तुमची कल्पना झालेली दिसते; परंतु आम्ही इमामशाहाला मुळीच भजत नाही. कबीर व शिरडीचे साईबाबा यांनी ज्याप्रमाणे हिंदु लोकांना पारमार्थीक उपदेश केल्यामुळे ते त्यांचे चेले बनले, त्याचप्रमाणे आमच्या वाडवडिलांना इमामशाहानें हिंदुधर्मतत्त्वानुसार पारमार्थीक उपदेश केल्यामुळे त्यांनी त्यांचे शिष्यत्त्व पत्करले व त्यांचा पंथ स्वीकारला. तीच परंपरा आम्ही पण स्वीकारली आहे. आम्ही इमामशहाला आमच्या पंथाचा मार्गदर्शक समजतो इतकेच.

प्रश्न : तुम्ही दैवत कोणते मानतां?

उत्तर : ब्रह्मा, विष्णु, महेश व आदिशक्ती ह्या आमच्या मुख्य देवता होत. व त्याचेच प्रतीक म्हणून कलशपाट व अखंड घृतज्योत यांच्याद्वारे आम्ही परमेश्वराची आराधना करतो.

प्रश्न : तुम्ही गाईला पूज्य मानत नाही असे प्रसिध्द झाले आहे. ते खरे काय?

उत्तर : मुळीच नाही. आम्ही गाईला अत्यंत पूज्य व पवित्र मानतो.

प्रश्न : वर्णाश्रमधर्म तुम्हाला मान्य आहे काय?

उत्तर : आम्हास तो पूर्ण मान्य आहे.

प्रश्न : वेदांना तुम्ही मानता की नाही?

उत्तर : आमच्या सत्पंथी ग्रंथातच मुळी वेदांना मान्यता दिलेली आहे. ''वेदशास्त्र कहेतेम करवू सही'' अशी आम्हास आमच्या शिक्षापत्री ग्रंथात गुरू इमामशहाची आज्ञाच आहे.

प्रश्न : तुमची उपासना चोरून म्हणजे गुप्त रितीने होत असते असे ऐकतो?

उत्तर : आमची उपासना मुळीच चोरून होत नाही. आमच्या उपासनेच्यावेळी कोणाही शुचिर्भूत माणसास तेथे येण्याची मुळीच आडकाठी नाही.

प्रश्न : तुमच्यातील काही चालरीती मुसलमानांप्रमाणे आहेत, हे खरे आहे काय?

उत्तर : आमच्यातील एकही चालीरीती मुसलमानांप्रमाणे नाही. दहावीस पिढ्यांपासून आम्ही येथे आहोत परंतु आमच्या आचरणांत मुसलमानांच्या चालिरीतींप्रमाणे एक तरी चाल आहे अशा बद्दलचा गावांतून एक देखील पुरावा मिळणार नाही.

प्रश्न : तुम्ही मोहरमच्या सणांत कधी भाग घेता काय?

उत्तर : मोहरमच्या सणांत आम्ही कधी व कसलाच भाग घेत नाही. इतर हिंदु सोंगे काढतील, ताजे मिरवतील,

ताज्यांना नवस करतील पण आम्ही दर्शनास देखील जात नाही.

प्रश्न : पूर्व दिशेला तोंड करून प्रार्थना करणे तुम्हाला निषीध्द आहे असे ऐकतो.

उत्तर : तुम्ही ऐकले ते मुळीच खरे नाही. दक्षीण दिशा फक्त आम्हाला वर्ज्य आहे. आम्ही दक्षीण दिशेशिवाय कोणीकडेही तोंड करून पूजा अगर प्रार्थना करू शकतो.

प्रश्न : तुम्ही अवतार मानता काय?

उत्तर : होय, परमात्म्याचे दाही अवतार आम्ही मानतो.

प्रश्न : आत्म्याचे अमरत्व व पुनर्जन्म हे सिध्दांत तुम्हाला मान्य आहेत काय?

उत्तर : पूर्णपणे मान्य आहेत.

प्रश्न : तुम्ही मांसाहार करता काय?

उत्तर : नाही. 'अहिंसा परमोधर्मः' हे आमचे तत्त्व आहे.

प्रश्न : मद्यसेवन करण्याबद्दल तुमच्या पंथात काय आज्ञा आहे.

उत्तर : सर्व मादक पदार्थांचा त्याग करावा असे आमच्या शिक्षापत्री ग्रंथात सांगितले आहे.

प्रश्न : खाण्यापिण्याच्या बाबतीत तुमचा नियम काय आहे। कोणाच्या हातचे शिजलेले अन्न किंवा पाणी तुम्हाला चालते काय?

उत्तर : नाही. जाती रिवाजाप्रमाणे रूढीनुसार आम्ही खाण्यापिण्याच्या बाबतीत सूक्ष्म विवेक ठेवितो.

प्रश्न : तुम्ही मृताची क्रिया कशी करतां?

उत्तर : जातिरूढीप्रमाणे करतो.

प्रश्न : तुमच्यात लग्नकार्यादि प्रसंगी उपायध्याय ब्राह्मण लागतो

किंवा नाही?

उत्तर : ब्राह्मण उपाध्यायाशिवाय ही कृत्ये होत नाहीत. आमच्या घराण्याचा स्वतंत्र उपाध्यायच आहे मुळी.

प्रश्न : तुम्ही एकादशी आदि व्रते करीत नाही म्हणे?

उत्तर : स्वतः मी एकादशी करतो; आणि इतर व्रतेही करतो. आम्ही रामनवमी, गोकुळाष्टमी, ध्रुवाष्टमी वगैरे व्रतेही पाळतो व सरदहू दिवशी आमचे संस्थानी मेळे भरतात.

प्रश्न : तुम्ही शुक्रवारचा उपवास पाळता, असा तुमचेवर आक्षेप आहे. तो खरा आहे काय?

उत्तर : मुळीच नाही. आम्ही शुक्रवार मुळीच पाळीत नाही. पुष्कळसे हिंदु हा उपवास पाळतात परंतु त्याबद्दल कोणी कधी शंका घेतली नाही हे आश्चर्य नव्हे काय?

प्रश्न : तुम्ही सत्यनारायण करिता काय?

उत्तर : मला तुमच्या या प्रश्नाचे मोठे हसू येते. तुम्ही आम्हाला आम्ही हिंदु नाही असे समजता की काय? आम्ही कलशपूजाच जर करतो तर सत्यनारायण कां करणार नाही? सत्यनारायणाचे पुजेत घट पुजा असते व ते तर आमचे मुख्य दैवतच आहे.

प्रश्न : तुम्ही सत्पंथी लोक 'अली'ला निष्कलंकी अवतार मानता हे खरे आहे काय?

उत्तर : मुळीच खरे नाही. आम्ही त्या सच्चिदानंदघन चित्स्वरूप नारायणालाच निष्कलंक अवतार मानतो.

प्रश्न : तुम्ही दिलेल्या एकंदर माहितीवरून तुमच्यात आक्षेपार्ह अगर धर्मबाह्य असे मला काहीच दिसत नाही. म ग सत्पंथाविषयी या नाना तऱ्हेच्या अफवा कशा उठल्या

आहेत?

उत्तर : त्याचे कारण असे आहे की, सत्पंथाच्या नावांवर पुष्कळसे लोक विकले जात आहेत. व त्यात पांचिया, सातीया, आठीया, मतीया इत्यादी भेद आहेत. काही आगाखानी खोजेही आपणांला सत्पंथी म्हणवीत आहेत. आता त्यांचे आचरण जर हिंदुधर्मबाह्य अगर हिंदुधर्मविघातक असेल, तर त्याचा दोष आमच्यावर कसा? उद्या कोणी मुसलमानही आपणांला सत्पंथी म्हणवू लागले, तर त्याला आम्ही काय करावे? आम्ही ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांच्या विरुध्द वर्तन असलेले लोक आमचे सत्पंथी नव्हत. त्यांचा आमचा कसलाही संबंध नाही व त्यांच्या कसल्याही कृत्याबद्दल आमचा सत्पंथ मुळीच जबाबदार नाही.

प्रश्न : तुमचा सत्पंथ हा कोणता सत्पंथ आहे?

उत्तर : आमचा सत्पंथ वैदिक सत्पंथ आहे.

प्रश्न : तुमच्या महंताच्या जागेवर कोणत्या जातीच्या मनुष्याची योजना केली जाते.

उत्तर : आमच्याच जातींतील मनुष्याची योजना महंताच्या जागेवर केली जाते. व तो मनुष्य बालब्रह्मचारी असावा लागतो.

प्रश्न : मला जर तुमच्या सत्पंथाची दिक्षा घ्यावयाची असेल तर ती कोणाजवळून मिळेल?

उत्तर : येथील सत्पंथाचे मंदिरांतील महंताजवळून मिळेल.

प्रश्न : बाबा इमामशाहाच्या गादीवर त्यांच्या पाठीमागून कोणाची स्थापना झाली?

उत्तर : बाबा इमामशाहाच्या हयातीतच त्यांच्या हाताने त्यांनी

एका बालब्रह्मचारी लेवा पाटीदार साधूची स्थापना केली. व तीच परंपरा आतां पावेतो चालू असून, हल्ली पंचवीस सव्वीसावी पिढी चालू आहे. हेच लेवा पाटीदार साधू आमचे दिक्षागुरू होत.

प्रश्न : तुम्ही 'पिराणा' हे ठिकाण काशीप्रमाणे मुख्य तीर्थस्थान मानता हे खरे आहे काय?

उत्तर : मुळीच नाही. आपल्या हिंदुंची जेवढी प्रमुख तीर्थस्थाने आहेत तेवढी आम्ही मानतो.

प्रश्न : प्रेताला दफन देतांना त्याचे डोके कोणीकडे असते?

उत्तर : आपल्या हिंदुपध्दतीप्रमाणेच असते.

प्रश्न : तुम्ही चेलम म्हणजे चासळीसावा करता काय?

उत्तर : आम्ही चेलम वगैरे मुळीच करीत नाही. दहावा, अकरावा व तेरावा करतो व तोही उपाध्यायाकडून करवितो व त्यावेळी ज्याला ऐपत असेल तो ब्राह्मणांस गाय दान देतो.

प्रश्न : तुमचा गुरूमंत्र 'इमामोहं' आहे असे सांगतात. ते खरे आहे काय?

उत्तर : मुळीच नाही. 'शिवोहं' शिवाय दुसरा कोणताच आमचा गुरूमंत्र नाही.

प्रश्न : ईश्वरासंबंधी तुमची काय कल्पना आहे.

उत्तर : ईश्वर हा सर्व सत्ताधीश आहे, त्याच्याच सत्तेने हे जग चालले असून सर्व जळी, स्थळी, अणुरेणूंत तोच भरला आहे. इतकेच नव्हे तर जेथे त्याच्या भावनेने दृष्टी टाकाल, तेथे तोच हजर आहे अशी आमच्या पंथाची शिकवणूक आहे, सिध्दांत आहे.

This book is an good example of use of Islamic Taqiyya. This book gives half truth with the aim of discrediting Shankaracharya.

प्रश्न : सत्पंथीयांना बंधन कोणते?

उत्तर : कळस आणि दीपज्योती हे ज्या अर्थी सत्पंथाचे आराध्य दैवत आहे, त्याअर्थी कळस म्हणजे घट व ज्योती म्हणजे आत्मा, चैतन्य ह्यांचे निदर्शक ती चिन्हे होत त्यावरून घटाघटांच्या ठिकाणीं चैतन्य रूपाने वसलेल्या आत्म्याचे पूजन हेच त्या अव्यक्त परमेशाच्या आराधनेचे साधन होय. अर्थात भूतमात्राच्या ठिकाणी एकच परमात्मा विराजमान झालेला आहे. अशी भावना हृदयात बिंबवणे हेच सत्पंथाचे ध्येय होय. हा ध्येय, हेतू चटकन लक्षांत यावा म्हणून कलश उर्फ घट व ज्योती ही प्रतिके सत्पंथाने आपल्या दृष्टीसमोर ठेवली आहेत. तेव्हा जो या प्रतिकांना मानून त्यांत गोंवलेल्या वरील तत्त्वाप्रमाणे चालतो तोच खरा सत्पंथी होय.

प्रश्न : असो, आता मी आपणाला जास्त त्रास देत नाही, दोनच प्रश्न विचारतो. हिंदूंचे कोणते ग्रंथ आपणांला मान्य नाहीत?

उत्तर : हिंदूंचे वेद, गीता, भागवत आणि इतर श्रध्दाग्रंथ आम्हाला पूर्णपणे मान्य व प्रमाण आहेत.

प्रश्न : आणखी एकच प्रश्न. समजा अखिल भारतीय हिंदु महासभेने तुमचे ग्रंथ तपासले व त्यांत हिंदुधर्माला विघातक अगर हिंदुधर्मबाह्य असे काही आढळले व ते तुम्हाला सोडण्याला सांगितले तर ते तुम्ही सोडाल किंवा नाही?

उत्तर : आमच्या ग्रंथात हिंदुधर्माला विघातक अगर हिंदुधर्मबाह्य असे जर काही अ. भा. हिंदु महासभेस तपासाअंती

आढळले, व त्यांनी ते आम्हास सोडण्यास सांगितले, तर आम्ही ते सोडण्यास केव्हाही तयार आहोत.

या एकंदर प्रश्नोत्तरावरून पाहतां सत्पंथीयांच्या आचरणात हिंदु धर्माला विघातक अगर हिंदुधर्मबाह्य अशी कोणतीच गोष्ट आढळून येत नाही. हिंदू किंवा वैदीक तत्त्वज्ञानाच्या आड त्यांचा पंथ कोणत्याही तऱ्हेने येत नसून, हिंदुधर्मातर्गतच त्याची शिकवणूक आहे. परमेश्वराची सर्वव्यापकता, अवतार, आत्म्याचे अमरत्व आणि पुनर्जन्म हे हिंदुधर्मांतील अतिउच्च आणि इतर कोणत्याही धर्मात न आढळून येणारे सिध्दांत हे ज्याअर्थी सत्पंथास मान्य आहेत, त्याअर्थी त्यास वेदबाह्य मुळीच म्हणता येत नाही. सत्पंथी हे मुसलमानी धर्मातील काही आचार विचार पाळतात, हे म्हणणे या खान्देशांतील लेवासत्पंथीयाचे बाबतीत तरी, अगदी निराधार आहे-- ज्यांचे प्रायश्चित्त गोमुत्राशिवाय होत नाही, जे मोहरमच्या सणांतील ताजे वगैरेचे दर्शनही घेण्यास राजी नाहीत, ते मुसलमानी धर्मातील काही आचार पाळत असतील असे कसे म्हणता येईल? जे वेद, गीता, भागवत; तसेच इतर श्रध्दाग्रंथ आणि गाय यांना पूज्य आणि प्रमाण मानतात, जे रामनवमी, गोकुळ, अष्टमी यांसारखे उत्सव करितात, जे एकादशीची कडकडीत उपोषणे करून हरिजागर करितात, जे चतुर्थी, ध्रुवाष्टमी इत्यादी व्रतांचे पालन करितात, अशांना हिंदुधर्मबाह्य ठरविणारांचे डोके तरी फिरले असले पाहिजे, किंवा हिंदुधर्माच्या नाशांतच त्यांना कृतकृत्यता वाटत असली पाहिजे, त्याशिवाय असे होणे शक्य नाही. काही आगाखानी मुसलमानही आपणांस सत्पंथी म्हणवीत आहेत. त्यांच्या हिंदुधर्मघातक आचरणावरून सर्वच

This book is an good example of use of Islamic Taqiyya. This book gives half truth with the aim of discrediting Shankaracharya.

सत्पंथी असे करतील असे मानणे कितपत योग्य होणार आहे याचा सुज्ञांनीच विचार करावा.

हिंदुधर्म व हिंदुसमाज़ जयिष्णु वर्धिष्णु होऊन त्याचे उज्वल स्वरूप, सर्व जगाच्या निदर्शनास यावे म्हणून बाटून परधर्मात, गेलेल्या हिंदुंनाच काय पण मुसलमानादी हाडाचा अस्सल परधर्मियांना देखील हिंदुधर्माच्या उदार आश्रयाखाली आज स्थान दिले जात आहे. हिंदुपुढाऱ्यांचे तेवढ्यासाठी प्रयत्न चाललेले आहेत तर इकडे जे मूळचेच हिंदु असून त्या हिंदूत्वापासून रेसभरही हटण्याला जे तयार नाहीत त्यांना बाहेर घालवून देण्याचा उपद्व्याप शंकराचार्य करीत आहेत. तेव्हा त्यांना हिंदुधर्माचे रक्षक म्हणण्याऐवजी त्याचे काळ म्हटले असतांच अधिक शोभेल. असो.

हिंदु समाजाचे कल्याण इच्छिणाऱ्या सर्व हिंदुबांधवांना माझी अशी विनंती आहे की, शंकराचार्यांनी जे आज्ञापत्र काढले आहे, ते कोणत्याही तऱ्हेचा तपास न करिता काढले असल्यामुळे ते मुळीच ग्राह्य मानू नये. तर उलट त्याचा तीव्र निषेध करून खान्देशातील सत्पंथियांचा पंथ पूर्णपणे वेदान्तर्गतच आहे असा ठराव त्यांनी अ.भा. हिंदु महासभेत एकमुखाने पास करावा. असे केले तरच ते आपल्या कर्तव्याला यावेळी जागले असे होणार आहे..

सर्वांचा नम्र,
दत्तात्रय रामचंद्र रारावीकर
हिंदूधर्म प्रचारक

सत्पंथ समाज हिंदूच आहे

सन १९३१ साली अकोला येथे हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले त्यावेळी लेवा पाटीदार सत्पंथी समाजाने हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळाकडे आपल्या समाजाच्या वेदानुयायित्त्वाबद्दल प्रमाणपत्र मागितले. त्यावेळी हिंदुमहासभेचे कार्याध्यक्ष डॉ. मुंजे यांनी सत्पंथीयांची सर्व चौकशी करून त्यांस पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र दिले :-

> *''प्रमाणपत्र देण्यात येतें कीं आमच्यापुढे मांडलेल्या कागदपत्रांवरून आम्ही असा स्पष्ट निर्णय देतो कीं खानदेशातींल लेवा पाटीदार यांचा सत्पंथ हा वेदबाह्य नाही. सबब त्यांच्या ज्ञातिबांधवांनी त्यांच्याशी जर काहीं वाद असेल तर तो मिटवावा आणि त्यांच्याबरोबर रोटी-बेटी व्यवहार सुरू करावा.''*

या निर्णयावरून हें स्पष्ट होत आहे कीं सत्पंथी हे हिंदू तर आहेतच, पण वेदबाह्यही नाहींत.

सन १९५१ च्या शिरगणतीतही सत्पंथी समाजाने आपण हिंदू आहोत अशीच नोंद केली आहे. तरी अखिल भारतांतील सत्पंथीयांना सर्वांनी ते हिंदूच आहेत असे समजून त्यांच्याशी व्यवहार करावा.

नारायण भास्कर खरे	[illegible]
अध्यक्ष, अ. भारत हिंदू महासभा, दिल्ली	उपाध्यक्ष, अ. भारत हिंदू महासभा, दिल्ली
रा. अ. कानिटकर	डॉ. रा. [illegible]
कार्यवाह, अ. भारत हिंदू महासभा, दिल्ली	कार्याध्यक्ष, अ. भारत हिंदू महासभा, दिल्ली

श्री सतपंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

प्रकाशित झालेले साहित्य

१)	मनहर ज्ञान	४=००
२)	अमृत वाणी	३=००
३)	श्री सत्पंथ नवनीत	३०=००
४)	सत्पंथ संप्रदाय स्वरूप व कार्य	१६=००
५)	श्री गुरू वंदना	३=००
६)	शिक्षापत्री	६=००
७)	नित्यपाठ	४=००
८)	शिक्षण संस्कार माला भाग १	१०=००
९)	शिक्षण संस्कार माला भाग २	१२=००
१०)	संतसमागम	१५०=००
११)	श्रीमद् दशावतार (प्रासादिक ग्रंथ)	४००=००
१२)	रथ जगन्नाथाचा	८०=००
१३)	सत्पंथाचे सत्यस्वरूप	५=००
१४)	धर्मपीठ फैजपूरचा इतिहास	१५=००

प्रकाशित होणारे साहित्य

१) श्री सत्पंथ घटपाट पूजा यज्ञविधी

२) भाभाराम सुबोध
३) मुनिवर चेतामणी
४) ऋषीवर चेतावणी
५) गुरूवाणी
६) योगवाणी
७) उपदेशवाणी
८) आगमवाणी
९) सतवाणी
१०) निकलंकी गीता
११) मुळबंध